श्री. एस.एस. निंबाळकर,सहाय्यक सरकारी अभियोक्ता, गट-अ यांना निलंबनानंतर सेवेत पुन:स्थापित केल्याने नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक :- डीपीपी-२०१४/प्र.क्र.४०१/पोल-१०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ११ जुन, २०१९

शासन आदेश :-

श्री. एस.एस. निंबाळकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या विरुध्द सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३१०३/२०१४ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामध्ये मा. विशेष न्यायाधिश, विशेष न्यायालय, बुलढाणा यांनी दिनांक २४.०५.२०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये श्री. एस.एस. निंबाळकर यांना निर्दोष मुक्त केले आहे. त्यास अनुसरुन श्री. एस.एस. निंबाळकर यांना समक्रमांक, दिनांक २० मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सेवेत पुन:स्थापित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता, श्री. एस.एस. निंबाळकर यांची बीड जिल्ह्यातील रिक्त असलेल्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पुर्व मान्यतेने सदर नियुक्ती करण्यात येत आहेत.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. श्री. एस.एस. निंबाळकर यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदाच्या पदस्थापनेचा कार्यभार तात्काळ स्वीकारावा. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता संचालक, अभियोग संचालनालय यांनी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

अ) श्री. एस.एस. निंबाळकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना नियुक्तीसाठी बीड जिल्हा प्रस्तावित करण्यात आला असून या जिल्ह्यात त्यांची कोठेही पदस्थापना संचालक, अभियोग संचालनालय यांनी करावी.

ब) श्री. एस.एस. निंबाळकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजु करुन घ्यावे. तसेच, याबाबतचा अहवाल तात्काळ शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असुन, त्याचा संगणक संकेतांक २०१९०६१११६५६५६१४२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.06.11 17:02:21 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

- श्री. एस.एस. निंबाळकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता (संचालक, अभियोग संचालनालय, म.रा., मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (गृह)(शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (गृह)(ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (अ. व सु.), यांचे स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी
९. संबंधीत सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता (संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत)
१०. निवड नस्ती/पोल-१०.